ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २५ डिसेंबर, १९५७ | अंक ४८

## विविध माहिती

**अन्नधान्याच्या वाहतुकीचा खर्च**—भारतामधील अन्न-टंचाईला तोंड देण्यासाठी परदेशांतून धान्याची आयात करावी लागत आहे. धान्याची आयात करण्यासाठी द्यावी लागणारी किंमत सोडून त्याच्या वहातुकीसाठी केवढा खर्च येतो ह्यासंबंधीं भारताचे वहातुकमंत्री श्री. लालबहादूर शास्त्री ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, गेल्या चार वर्षांत भारताला केवळ वाहतुकीसाठी ७० कोटी रुपये द्यावे लागले.

**हैड्रोजन बाँबच्या शक्तीवर नियंत्रण**—हैड्रोजन बाँबच्या स्फोटामुळें उत्पन्न होणाऱ्या संहारक शक्तीला वेसण घालून ती औद्योगिक कार्याला वापरण्याचा प्रयत्न निरनिराळीं पुढारलेलीं राष्ट्रें करीत आहेत. अजून पूर्ण यश कोणालाच आलेलें नसलें तरी ब्रिटिश शास्त्रज्ञांनीं ह्या बाबतींत एक महत्त्वाचें प्राथमिक पाऊल टाकलें आहे, अशी वार्ता आहे.

**हुबळी ते कारवार रेल्वेरस्ता**—हुबळीपासून कारवार बंदरापर्यंत नवा रेल्वेमार्ग होण्याची फार आवश्यकता आहे, असें मत म्हैसूरच्या मुख्य मंत्र्यांनीं व्यक्त केलें आहे. भारतामधील बोटी बांधण्याचा दुसरा कारखाना कारवार येथें उभारण्यांत यावा असा आग्रहहि राज्यसरकारतर्फें धरण्यांत येत आहे. कारवार बंदरांतून दक्षिणेंतील अशुद्ध लोखंडाची निर्यात करणें सोपें जाईल, असें सांगण्यांत येत आहे.

**पाकिस्तानसाठी धान्य**—१९५८ सालीं पाकिस्तानला अमेरिकन सरकारकडून ६,७३,००० टन अन्नधान्य शेतमालाच्या विल्हेवाटीच्या कायद्याप्रमाणें मिळणार आहे. ह्या अन्नधान्यांत ६,२३,००० टन गहूं आहे आणि ५०,००० टन तांदूळ आहे. ह्यासंबंधींच्या करारावर गेल्या नोव्हेंबरमध्यें सह्या करण्यांत आल्या.

**खतांच्या कारखान्यांबद्दलचें धोरण**—भारताचे अन्नमंत्री श्री. अजितप्रसाद जैन ह्यांनीं लोकसभेंत असें सांगितलें कीं, खतांचे नवीन कारखाने काढण्याच्या सरकारी धोरणांत बदल करण्यांत आला आहे. सरकारच्या नव्या धोरणास अनुसरून खाजगी मालकीच्या विभागांत सुद्धां आतां ते काढतां येतील.

**बंदरांसाठी नवी यंत्रसामुग्री**— भारतामधील बंदरांची मालाची चढ-उतार करण्याची शक्ति वाढविण्यासाठी नवीन यंत्रसामुग्रीची आवश्यकता आहे. ती खरेदी करण्यासाठी भारताचे प्रतिनिधी परदेशांत गेले आहेत. पश्चिम युरोपांतील देशांचा तीन आठवड्यांचा दौरा केल्यानंतर त्यांनीं ब्रिटनमधील व पश्चिम जर्मनींतील कारखान्याकडे मालाची मागणी नोंदविली आहे.

**मालवाहू डब्यांची निर्यात**—सूदानचें सरकार भारतांत तयार झालेले रेल्वेचे मालवाहू डबे विकत घेण्याचा संभव आहे. सध्यां भारत सूदानकडून मुख्यतः कापसाची आयात करतो आणि कापसाचें कापड, तागाच्या वस्तू आणि चहा ह्यांची निर्यात करतो. सूदानमधील कापसाच्या उत्पादनांत एकसारखी वाढ होत आहे.

**संरक्षणासाठी झालेला खर्च**—पाश्चिमात्य राष्ट्रांनीं स्थापन केलेल्या नाटो संरक्षण कराराप्रीत्यर्थ गेल्या आठ वर्षांत ८,००० कोटी पौंड खर्च झाले आहेत, असा हिशोब रशिआनें केला आहे. पण रशिआनें केलेल्या शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीमुळें ह्या प्रचंड खर्चाचें अवमूल्यन होऊन ब्रिटिश नागरिकांनीं केलेल्या स्वार्थ-त्यागाचें मोलहि घटलें आहे, अशी टीकाहि करण्यांत आली आहे.

**अल्प मुदतीचीं कर्जें**—पाटणा शहराच्या विभागांत छोट्या उद्योगधंद्यांना अल्प मुदतीचीं कर्जें देण्याची एक प्रायोगिक योजना स्टेट बँक ऑफ इंडियानें भारत सरकारच्या संमतीनें सुरू केली आहे. उद्योगधंद्यांच्या मालकांना कच्च्या अगर पक्क्या मालाच्या तारणावर बँकेकडून कर्ज मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**रूरकेला कारखान्याची यंत्रसामुग्री**—मध्यवर्ती सरकारच्या खाणी व तेलमंत्र्यांनीं राज्यसभेंत अशी माहिती सांगितली कीं, रूरकेला येथें उभारण्यांत येत असलेल्या पोलादाच्या कारखान्यासाठी ९६·५ कोटी रुपये किंमतीची यंत्रसामुग्री लागेल. एकूण ३,५०,००० टन वजनाची यंत्रसामुग्री लागेल, त्यापैकी ३६,००० टन आयात करण्यांत आली आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सहकारी संस्थांची कार्यपद्धति

( लेखक : कृष्णाजी भाऊराव देशपांडे, को. ट्रे. इन्स्पेक्टर, पुणें. पृ. सं. ३२८. किं. ५ रु. मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता, पुणें २ ).

खेड्यांत काम करणाऱ्या सेक्रेटरीला, विशेषतः सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासमधील विद्यार्थ्यांना, अभ्यास करतांना पाठ्यपुस्तकांची मोठीच उणीव भासते. कारण, मंजूर अभ्यासपत्रकानुसार लिहिलेलीं पुस्तकें उपलब्ध नाहींत. ही उणीव दूर करण्याच्या दृष्टीनेंच श्री. कृ. भा. देशपांडे ह्यांनीं प्रस्तुत पुस्तक लिहिलें आहे. "सहकारी संस्थेचा सेक्रेटरी हा सहकारी शासन–पद्धतींतील शेवटचा पण अत्यंत महत्त्वाचा असा दुवा आहे. त्याचा संस्थेच्या दैनंदिन व्यवहाराशीं संबंध येत असल्यानें, त्याच्या भल्याबुऱ्या कृतींवर संस्थेचें भवितव्य व पर्यायानें चळवळीचें भवितव्य अवलंबून असतें. तेव्हां, अशा सेक्रेटरींना सहकारी कायद्याबद्दल विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीबद्दल व त्यांच्या हिशेबी व्यवहाराबद्दल संपूर्ण कल्पना असणें किती आवश्यक आहे, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं" असें श्री. बा. म. चिटणीस ( असि. सेक्रेटरी, सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशन, दिल्ली व माजी डेप्युटी रजिस्ट्रार, को. सो. पुणें ) ह्यांनीं पुस्तकाला पुरस्कार लिहिला आहे, त्यांत म्हटलें आहे.

श्री. देशपांडे ह्यांनीं आपल्या पुस्तकाची रचना स्वतःच्या, शिक्षकाच्या अनुभवावर आधारलेली आहे. विद्यार्थ्यांना नेमकें काय हवें आहे, ह्याची लेखकाला वास्तव कल्पना आहे. सहकारी ट्रेनिंग क्लास परीक्षेसाठी असणारे सहकार, सहकारी कायदा व इतर कायदे, जमाखर्च व सेक्रेटरीच्या कामाची माहिती, हे सर्व विषय एकाच पुस्तकांत विशद करून सांगितलेले आहेत. ह्या पुस्तकाचा उपयोग परीक्षेच्या अभ्यासासाठीं उत्कृष्ट होईलच; पण त्याबरोबरच सहकारी चळवळीशीं कोणत्याहि प्रकारें संबंध पोंचणारे सर्व लोक ह्या पुस्तकाच्या वाचनानें आपआपल्या कार्यांत अधिक प्रवीण होतील ह्यांत संशय नाहीं. पुस्तकाची भाषा वाचकाला समजेल इतकी सोपी असल्यानें, विषय कळण्यास अवघड जात नाहीं.

पुस्तकाच्या पहिल्या भागांत ३३ प्रकरणें असून, त्यांत सहकाराचा थोडक्यांत इतिहास, सहकाराची तात्त्विक माहिती, सोसायट्यांचे प्रकार, सहकारी संस्थांची माहिती, ऑडिट, सहकारी संस्थांना मिळालेल्या सवलती, मुंबई राज्याची पंचवार्षिक योजना, इत्यादि विषय आले आहेत. दुसऱ्या भागांत सहकारी कायदा, शेतकी मालविक्री कायदा, कूळकायदा, सावकारी कायदा, कोठार कायदा, इत्यादि विषयांचीं ५ प्रकरणें आहेत. तिसऱ्या भागाचा जमाखर्च व अंतर्व्यवस्था ह्याकडे विनियोग केला आहे.

सोपी भाषा, पद्धतशीर विवेचन, सुबोध रचना, अनुभवसिद्ध मार्गदर्शन, इत्यादि गुणांमुळें प्रस्तुत पुस्तक प्रत्येक सोसायटीनें स्वतःजवळ बाळगून त्याचा उपयोग करणें अत्यंत आवश्यक आहे. तात्त्विक चर्चा, कायद्यांच्या व नियमांच्या तरतुदी आणि व्यावहारिक सूचना, ह्यांचा ह्या पुस्तकांत सुंदर मिलाफ आढळतो.

---

## खेडा जिल्हा बँकेनें डिबेंचर्स अंडरराइट केलीं

मुंबई प्रां. को. लँड मॉर्गेज बँकेनें ३० लक्ष रुपयांचीं, ४½% व्याजाचीं, १९७२ सालीं परतफेडीचीं, डिबेंचर्स विक्रीस काढलीं, तीं सर्वच्या सर्व खेडा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नडियादनें अंडरराइट केलीं आहेत.





'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
१ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
सरदारगृह
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २५ डिसेंबर, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## काथ्याच्या उद्योगधंद्यापासून परदेशीय हुंडणावळ

भारताचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पाडण्यासाठी ७०० कोटी रुपयांच्या परदेशीय हुंडणावळीची आवश्यकता आहे अशी माहिती अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं नुकतीच सांगितली. भारतामधून चहा, ताग, मँगेनीझ, इत्यादि माल निर्यात करून परदेशीय हुंडणावळ मिळविता येते. काथ्याच्या धंद्यापासूनहि परदेशीय हुंडणावळ मिळविण्याची शक्यता असल्यानें भारत सरकारनें ह्या धंद्यांच्या विकासासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पहिल्यापेक्षा अधिक रकमेची तरतूद केली आहे, असें समजतें. ह्या कामासाठी प्रथम १ कोटी रुपये मंजूर करण्यांत आले होते. पण आतां १·७० कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. हा धंदा मुख्यतः पूर्वीच्या त्रावणकोर–कोचीन म्हणजे राज्यपुनर्रचनेनंतरच्या केरळ राज्यांत केंद्रित झालेला आहे. १९५५ सालीं ह्या राज्यांत काथ्याचे १२१ कारखाने होते. १९५४ सालीं त्यांची संख्या १२८ व १९५३ सालीं ११६ होती. हे सर्व कारखाने खाजगी मालकीच्या कंपन्यांकडून चालविले जात आहेत. १९५५ सालीं ह्या धंद्यांत रोजगारी करणाऱ्या कामगारांची एकूण संख्या १०,००० पर्यंत होती.

राज्यसरकारांना ह्या धंद्याचा विस्तार करण्यासाठी जी मदत देण्यांत यावयाची, तीमध्येंहि वाढ करण्यांत आली आहे. मुळांत ही रकम ७० लाख एवढीच होती. पण आतां राज्यसरकारांच्या योजनांसाठी १·४० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. काथ्याच्या धंद्याचा अधिक जलद व चांगल्या रीतीनें विस्तार करता यावा म्हणून राज्य-सरकारांकडून अधिक पैशाची मागणी करण्यांत येत होती. काथ्या, त्यापासून तयार केलेले दोर व दोऱ्या, आणि इतर माल ह्यांच्या निर्यातींत हळूहळू वाढ होत आहे. १९५६–५७ सालच्या पहिल्या दहा महिन्यांतील निर्यातीची १९५५–५६ सालच्या पहिल्या दहा महिन्यांतील निर्यातीशीं तुलना केली तर ६० लाख रुपये किंमतीच्या अधिक मालाची निर्यात झाली असें दिसून येतें. १९५६ च्या एप्रिलपासून १९५७ च्या जानेवारी महिन्यापर्यंतच्या काळांत सुमारें ६७,२०० टन वजनाचा काथ्या व काथ्याचा माल निर्यात करण्यांत आला. ह्या मालाची किंमत ८·०४ कोटी रुपये झाली. १९५५–५६ सालामधील ह्याच काळांतील आंकडे अनुक्रमें असे होते. एकूण ६०,००० टन माल निर्यात करण्यांत आला व त्याची किंमत सुमारें ७·४५ कोटी रुपये झाली. १९५५–५६ ह्या पूर्ण वर्षी निर्यात केलेल्या काथ्याच्या मालाची किंमत ९·०९ कोटी रुपये झाली. त्यापूर्वीच्या १९५४–५५ ह्या वर्षांत निर्यात केलेल्या मालाची किंमत ८·५५ कोटी रुपये झाली. काथ्याच्या मालाचा खप देशांत व देशाबाहेर वाढावा म्हणून प्रयत्न करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी १९५७–५८ सालीं ४·२ लाख रुपयांची रकम बाजूला काढून ठेवण्यांत आली आहे.

काथ्याच्या धंद्याचे कारखाने व त्यामधील चाऱ्या ह्यांची मोजदाद काथ्याविषयक बोर्डानें पुरी केली आहे. मुंबई येथील इंडिअन सेंट्रल कॉटन इन्स्टिट्यूट ह्या संस्थेत काथ्याविषयीं तज्ज्ञांकडून संशोधन करण्यांत येत आहे. त्याशिवाय अशा प्रकारचें संशोधन करण्यासाठी केरळ राज्यांतील अलेप्पी ह्या ठिकाणीं एक मध्यवर्ती संशोधनकेंद्र स्थापन करण्याचे मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. रिझर्व्ह बँकेनें ह्या धंद्याला मदत करण्याचा विचार चालविला आहे.

## लोकसंख्येच्या वाढीचा निरंतरचा प्रश्न

जगांत दरवर्षी वाढत चाललेल्या लोकसंख्येबद्दल सर्वच राष्ट्रांतील विचारवंतांना व अर्थशास्त्रज्ञांना चिंता वाटत आहे. वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न फक्त आशिआपुरताच मर्यादित राहील असा विश्वास अजूनहि कांहीं वेळां व्यक्त करण्यांत येतो. पण अमेरिकेसारख्या औद्योगिक व शेतीच्या बाबतींत प्रगत असलेल्या देशांतहि लोकसंख्येच्या प्रश्नानें गंभीर स्वरूप धारण करण्यास सुरवात केली आहे. दुसरें महायुद्ध संपल्यापासून अमेरिकेंतील जननाचें प्रमाण झपाट्यानें वाढत आहे असें आढळून आलें आहे. अमेरिकन लोकांच्या रहाणीचें मान लक्षांत घेतां ह्या वाढत्या प्रमाणाची चिंता विशेष तीव्र असावी ह्यांत नवल नाहीं. कॅलिफोर्निआ विद्यापीठांतील प्राध्यापक डॉ. किंग्स्ले डेव्हिस ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं, पुढील शतकाच्या आरंभीं जगाची लोकसंख्या ६०० कोटींच्या आसपास असेल. सध्यां जगाची लोकसंख्या २६० कोटी आहे. हे दोन्हीं आंकडे जवळ ठेवले म्हणजे ह्या प्रश्नाचें चिंताजनक स्वरूप आणखीच उघड होतें. आशिआंतील देशांचें जननाचें दरहजारी प्रमाण तर इतकें मोठें आहे कीं, त्यामुळें अविकसित देशांचा आर्थिक विकास घडवून आणण्याचें कार्य बिकट होऊन बसलें आहे. चीनच्या लोकसंख्येंत दरसाल १·२ कोटींची भर पडत आहे. भारताची लोकसंख्या ५० लाखांनीं वाढत आहे. रशिआची लोकसंख्या दरसाल ३० लाखांनीं वाढत आहे. उपभोग्य मालाचें वाढतें उत्पादन आणि कुटुंबनियोजनाच्या योजना अशा दोन्हीं बाजूंनींच लोकसंख्येचा प्रश्न सोडविणें शक्य कोटींत येईल हें मत आतां सर्वमान्य होऊं लागलें आहे.

## नाशिक येथें चलनी नोटांचा नवा छापखाना

नाशिक येथील सध्यांच्या इंडिया सिक्युरिटी प्रेसच्या जवळच चलनी नोटांचा एक नवा छापखाना सुरू करण्यासाठी इमारत बांधकाम चालू आहे. यासाठी चालू वर्षाच्या अर्थसंकल्पांत ७१·५४ लाख रु. ची तरतूद करण्यांत आली आहे. उरलेल्या भांडवली खर्चाची तरतूद १९५८–५९ च्या अर्थसंकल्पांत करण्याचा विचार आहे. सुरवातीस या छापखान्यांत एक रुपयाच्या नोटा छापण्यांत येतील. वाढत्या किंमती व माल मिळण्यास लागणारा वेळ या गोष्टी लक्षांत घेऊन आवश्यक यंत्रसामुग्री इमारत बांधून होण्यापूर्वीच मागविण्यांत आली आहे. यंत्रसामुग्रीपैकीं महत्त्वाच्या यंत्रांस ५० लाख रु. खर्च येण्याची अपेक्षा आहे.

## जपान व रशिआ ह्यांच्यांत व्यापारी करार

जपान व रशिआ ह्या राष्ट्रांच्या इतिहासांत प्रथमच एक व्यापारी व दर्यावर्दी वहातुकीचा करार करण्यांत आला आहे. ह्या करारामुळें उभयता देशांत शांततेचा तह होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. व्यापारी कराराबरोबरच देण्या-घेण्यांच्या व्यवस्थेसंबंधींहि एक करार करण्यांत आला आहे. हा करार एक वर्ष मुदतीचा असून देणींघेणीं पौंडी चलनांत रोखीनें भागवावयाचीं आहेत. व्यापारी करार पांच वर्षे मुदतीचा असून देण्याघेण्याच्या कराराची मुदत दरवर्षी वाढविण्यांत येणार आहे. हा करार करण्यासाठीं बऱ्याच गुंतागुंतीच्या वाटाघाटी करण्यांत आल्या. पण अखेर सायबेरिआंतील वाढत्या बाजारपेठेचा मोह जपानला पडला आणि रशिआलाहि सायबेरिआचा विकास जपानच्या मदतीनें करणें अधिक सोपें आहे असें वाटलें. सध्यां सायबेरिआचा औद्योगिक विकास करण्याचें काम रशिआनें झपाट्यानें चालविलें आहे. ह्या विकासासाठीं लागणारी अनेक प्रकारची यंत्रसामुग्री जपानला सुलभतेनें पुरवतां येण्यासारखी आहे. पश्चिम रशिआंतून जरूर ती यंत्रसामुग्री आणावयाची तर ती रेल्वेमार्गानें ४,००० मैल वाहून पूर्वेकडे आणावी लागेल. त्यापेक्षा ती जपानकडून विकत घेणें अधिक स्वस्त पडणार आहे. जपानमधील उद्योगपतींचा असा अंदाज आहे कीं, रशिआकडून रेल्वेचें साहित्य, विजेची यंत्रसामुग्री, कापडाच्या गिरण्या, पोलाद, बांधकामाचीं यंत्रें, मच्छीमारी बोटी, इत्यादि प्रकारच्या मालाची मोठी मागणी येईल. उलटपक्षीं, रशिआ जपानला विविध प्रकारचा औद्योगिक कच्चा माल पुरवील अशी अपेक्षा आहे. उभयपक्षीं एका वर्षांत सुमारें ६ कोटी पौंड किंमतीच्या मालाची देवघेव होण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्र बँकेचा शाखाविस्तार

### बँकेचे मॅनेजर, श्री. चिं. वि. जोग, यांचा मराठवाड्यांतील दौरा

सन १९५६ सालामध्यें दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. या बँकेनें मराठवाड्यामध्यें औरंगाबाद, जालना, नांदेड या प्रमुख व्यापारी केंद्रांचे ठिकाणीं शाखा उघडल्या त्यानंतर चालू वर्षी ता. ३-१२-१९५७ पासून ७-१२-१९५७ पर्यंत बँकेनें हिंगोली (जि. परभणी), मोमीनाबाद (जि. बीड) व लातूर (जि. उस्मानाबाद) येथें शाखा उघडल्या. यानिमित्तानें बँकेचे मॅनेजर श्री. चिं. वि. जोग यांनीं मराठवाड्यांतील कांहीं प्रमुख व्यापारी केंद्रांना भेटी देऊन स्थानिक व्यापारी व कारखानदार यांच्या व्यापारविषयक अडचणी समजून घेतल्या व त्यांना या कामीं बँकेकडून जरूर त्या मदतीचें आश्वासन दिलें.

"मराठवाडा" हा भाग बँकिंगचे दृष्टीनें मागासलेलाच गणला जातो व तेथें अधिक बँकांची आवश्यकता भासत होती. या भागांतील व्यापार व उद्योगधंद्यांचे वाढीला बँकांची फारच जरूरी होती. ती गरज या बँकेच्या नवीन शाखांमुळें भरून निघणार आहे.

बँकेची आणखी एक शाखा परळी–वैजनाथ (जि. बीड) येथें लवकरच सुरू होणार आहे.

* * *

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें या बँकेची शीव, मुंबई नं. २२ येथील शाखा गुरुवार दि. १२ डिसेंबर १९५७ पासून सुरू झाली आहे. शाखेचें उद्घाटन बँकेचे चेअरमन, श्री. वा. पुं. वर्दे यांनीं केलें.

**कण आणि क्षण**
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखक :—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

**સુખી જીવનની પગદંડી**
( ગૃહજીવનનું માંગલ્ય )
લેખકઃ—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"
ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂ. ૧-૮-૦

*** दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ***
( शिड्यूल्ड बँक )
हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, (फोन २७६३) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, (फोन २०४०८)
अध्यक्ष श्री. ग. रा. साठे
अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५८,००,०००
उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट
★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर

## सहकारी न्यायदान निर्दोष व सुलभ कसें होईल ?

लेखकः— स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., वकील, पुणें ४.

सहकारी न्यायदानासाठी प्रांतांत स्वतंत्र सहकारी कोर्टाची स्थापना होवून अदुमासें २५ वर्षांचेवर कालावधि लोटलेला आहे. ह्या प्रदीर्घ कालांतील सिंहावलोकन करून सहकारी न्यायदान संपूर्ण दोषरहित व सुलभरीत्या होतें. किंवा काय ह्याबाबत विचार करणें जरूर झालें आहे. राज्यांतील सर्वव्यापी सहकारी चळवळीचें कार्यक्षेत्र प्रतिदिनी व्यापक होत असून जास्त जास्त मंडळी सहकारी चळवळींत सामील होत आहेत. निरनिराळ्या सरकारी योजना सहकारी तत्वावर व प्रांतांतील निरनिराळ्या सहकारी संस्थांवर अधिष्ठित झालेल्या आहेत. अशा परिस्थितींत सहकारी न्यायदान क्लिष्ट व पूर्वीच्या जुन्या परंपरेवर आधारलेलें असल्यास त्याचे दुष्परिणाम सहकारी क्षेत्रांतील काम करणाऱ्या सर्व मंडळीस भोगावे लागून राष्ट्रविकास कार्यावरहि त्याचा विघातक परिणाम होणेचा संभव प्राप्त झालेला आहे किंवा कसें, हेंच प्रामुख्यानें पहावयाचें आहे.

### नॉमिनींच्या नेमणुका

सहकारी कोर्टांत न्यायदान करणाऱ्या अंमलदाराच्या गेल्या ५-१० वर्षांतील नेमणुकांकडे पाहिल्यास, सहकारी खात्यांतील सेवानिवृत्त मंडळी, सहकारी क्षेत्रांतील कायदा न जाणणारे पदाधिकारी, अशांच्या नेमणुका होत असत. अलीकडे ही परिस्थिति थोडी पालटली आहे. कोर्टांत काम करणाऱ्या वकीलवर्गामधून या नेमणुका करण्याकडे हल्लीं कल आहे. परंतु सर्वच नेमणुका वकीलवर्गांतून होत नाहींत. तसेंच ह्या नेमणुका होतांना पात्रापात्रतेचा फारसा विचार होत नाहीं, अशाहि तक्रारी होतात. अनुभवी व कायद्याचें ज्ञान नसणाऱ्या मंडळींच्या रजिष्ट्रार्स नॉमिनी म्हणून नेमणुका होणें न्यायदानाचे दृष्टीनें हितावह नाहीं. तसेच सदरच्या नेमणुका करतांना तज्ज्ञ वकील नॉमिनी म्हणून काम करणेस कबूल असल्यास त्यांच्याच नेमणुका केल्या जाव्यात.

### नेमणुका कोणी करावयाच्या ?

सहकारी न्यायदान करणाऱ्या मंडळींच्या प्रतिवर्षी गॅझेटमध्यें नेमणुका प्रसिद्ध होतात, आणि बहुतांशीं सहकारी खात्यानें केलेल्या शिफारशींवर त्या अवलंबून असतात. दिवाणी कायद्याची व कामाची माहिती असणारे तज्ज्ञ वकील कोण याची माहिती जिल्हा न्यायाधीशास असते; व ह्या नमणुका करतांना त्याबाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हा न्यायाधीशाकडे सुपूर्त व्हावयास पाहिजेत.

### सहकारी दावे

ज्या भागांत सहकारी संस्थेचे रजिष्टर्ड ऑफिस आहे त्या भागांतील असिस्टंट रजिष्ट्रार को. सो. यांचेकडे सहकारी दावे दाखल केले जातात. ही पद्धत त्वरीत पालटली पाहिजे. रजिष्ट्रार को. सो. यांचेकडे राज्यांतील सर्व सहकारी दावे पोस्टानें दाखल केले जावेत; व त्या त्या विभागांतील नेमलेल्या नॉमिनीकडे सदरचे दावे रजिस्टर्ड पोस्टानें मे. रजिष्ट्रार यांनीं क्रमाक्रमानें पाठवावे. दाव्यांच्या वाटपाचें काम चोख व प्रामाणिकपणें होणेसाठी वर नमूद केलेप्रमाणें तजवीज करणेची जरूरी आहे.

### नॉमिनींच्या नेमणुकीची मुदत

रजिष्ट्रार्स नॉमिनी यांची नेमणूक एक वर्षापुरती असते; व दरवर्षी पुनः नेमणुका केल्या जातात व प्रतिवर्षीच्या यादींत फारसा बदल होत नाहीं. ही चालू पद्धत गैरसोईची व जादा खर्चाची आहे. शिवाय वर्षअखेरीस गॅझेट बाहेर पडून नॉमिनींची नांवें जाहीर होईतोंपर्यंतच्या काळांत आलेले लवाद दावे तसेंच ठेवावे लागतात. त्यामुळें दाव्याच्या निर्णयास कालहरण होतें. सदरच्या नेमणुका कमींतकमी ५ वर्षांपर्यंत ठेवल्या जाणें श्रेयस्कर आहे.

### सहकारी दाव्याच्या निर्णयाचें स्थळ

सहकारी दाव्याचा निर्णय करणेसाठी जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणीं जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक अगर सुपरवायझिंग युनिअनचें ऑफिस निश्चित करणेंत यावींत; व त्या त्या विभागाच्या नॉमिनींनीं सदर ठिकाणीं दाव्यांचा निर्णय करावा. सोसायटीचे ऑफिसांत जावून दाव्याची चौकशी करावी, ह्याबाबत दिलेले आदेश दुरुस्त करणेची वेळ आलेली आहे. वादी अगर प्र. वादी सोसायटीचे ऑफिसांत जावून दाव्याचा निर्णय करून घेणें कांहीं पक्षकारांना मानहानीचें वाटतें. कांहीं वेळेस अशा पक्षकारांची सोसायटीचे ऑफिसांत टवाळी होते.

### दाखल कागदपत्र

लवाद दावा दाखल करतांना वादी ज्या कागदपत्राच्या आधारें दावा दाखल करतो त्या कागदांच्या नकला, फिर्यादीसोबत जोडल्या पाहिजेत. तसेंच जितके प्र. वादी असतील त्या सर्वांना देणेसाठी फिर्यादीची एक एक नकल व दाखल केलेल्या कागदांच्या नकला अगर खातेंउतारे दिले गेले पाहिजेत.

### लवाद दाव्यांतील खर्च

लवाद दावा रजिष्ट्रार्स नॉमिनीकडे निर्णयासाठी पाठवलेवर दाव्याचा संपूर्ण निर्णय होईपावेतों स्टेशनरी फॉर्म्स, पोस्टेज, टायपिंग ह्यावर बराच खर्च करावा लागतो. ह्या खर्चास इनसिडेंटल चार्जेस अशी संज्ञा आहे व हा खर्च जास्तींत जास्त रु. ५ पर्यंत करावा असें सांगणेंत येतें. ज्या दाव्यांत बरेच प्र. वादी असतात त्या सर्वांना समन्सें, मनाई हुकूम, नोटिसा, वगैरे रजिस्टर्ड पोस्टानें पाठवावयाचें झाल्यास पोस्टाचा खर्च बराच येतो व प्राथमिक खर्चाकरतां मंजूर होणाऱ्या पांच रुपयांतून हा खर्च भागत नाहीं. त्याबरोबरच जजमेंट व अवार्डच्या टायपिंगचे कामाबद्दल कांहींहि तरतूद केलेली नाहीं. प्रत्यक्षांत होणारा खर्च मंजूर करणेसाठी योग्य ती तरतूद केली पाहिजे.

### प्रवासभत्ता व किरकोळ खर्च

परतालुक्यांत अगर परठिकाणीं जावून कांहीं दाव्यांची चौकशी करणेचा प्रसंग कांहीं लवाद दाव्यांत उपस्थित होतो. जातांयेतांचें भाडें व किरकोळ तदनुषंगिक खर्चाबाबत सहकारी



कायद्यांत अगर त्यासालील कानूंत कांहींहि तरतूद नाहीं. दाव्याच्या चौकशीसाठी नेमलेलीं ठिकाणें फार दूर अंतरावर असून रजिष्ट्रार्स नॉमिनीस सर्व दिवस प्रवासांत घालवावा लागतो. तसेंच वाटखर्चाची कांहींहि तरतूद केलेली नसते. तसेंच प्रवास-भत्ता, भाडे व किरकोळ खर्च हा रजिष्ट्रार्स नॉमिनीस आगाऊ उपलब्ध करून देणें जरूर आहे. अगोदर पदरखर्च करून निर्णय केलेल्या दाव्याच्या रकममंजुरीनंतरहि संस्था अगर पक्षकार रक्कम देणेस काळकाढूपणा करतात; व मंजूर रकमेच्या वसुलीसाठी निष्कारण पत्रव्यवहार होऊन जादा खर्च करावा लागतो. तसेंच दावा दाखल करून घेतेवेळीं संबंधीं अधिकाऱ्यांनीं दाव्याच्या फीची व खर्चाची रकम अगोदर डिपॉझिट करून घेतली पाहिजे. सहकारी संस्थांना ह्याबाबत मोकळीक ठेवूं नये; व अशा तऱ्हेनें रक्कम डिपॉझिट झाल्याशिवाय लवाद-दावा निर्णयास पाठवला जाऊं नये.

### लवाद फी

सहकारी दाव्याच्या फीचें सरकारनें मंजूर केलेलें कोष्टक अतिशय अल्प आहे. दाव्याचा निर्णय करतांना ज काम करावें लागतें त्यामानानें वेतन अगदींच अपुरें आहे. पैक्याच्या दाव्या-बाबत हें कोष्टक अतिशय असमाधानकारक आहे; व त्यांत आमूलाग्र बदल होणें जरूर आहे. पैक्याच्या दाव्यांतील कमाल लवाद फी रु. १५० पर्यंत ठेवावी. ज्या दाव्यांत चौकशीचें काम बरेच दिवस चालतें व अनंतकालपर्यंत काम करावें. लागतें त्या दाव्यांत कामाच्या मानानें फीची आकारणी व्हावी. पैक्याचा दावा केवढ्याहि रकमेचा असला तरी नॉमिनीस रु. ३० पर्यंतच फी मिळते. ही परिस्थिति त्वरित पालटली पाहिजे.

### कायद्यावरील अधिष्ठित न्यायदान

सहकारी न्यायदान न्याय्य व सद्सद्विवेकबुद्धि यांजवर आधारभूत आहे. कायदेशीर प्रश्न-उपप्रश्नांना लवाददाव्याचे निर्णयाचे कामीं दुय्यम स्थान दिलें गेलें आहे. कित्येक लवाद-दाव्यांत कायदेशीर महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात परंतु सहकारी न्यायदान करतांना त्यांना योग्य तें महत्त्व दिलें जात नाहीं. सहकारी न्यायदान करणारे अंमलदार न्याय्य व सद्सद्विवेकबुद्धि यांचा अर्थ त्यांच्या मताप्रमाणें व लहरीपणानें लावून कायदेशीर प्रश्नांना अग्रस्थान देत नाहींत व त्यामुळें पक्षकारावर अप्रत्यक्षपणें अन्याय होतो. कायदेशीर मुद्यांना योग्य व अग्रस्थान देवून त्यांचा निर्णय कायद्याप्रमाणें देणें हें आद्य कर्तव्य होय. परंतु ह्या कायदेशीर प्रश्नांचें महत्त्व न समजल्यामुळें अगर लहरीप्रमाणें न्यायदान करणेच्या दुराग्रहामुळें निरनिराळे घोटाळे व अन्याय निर्माण होवून सहकारी न्यायदानावर त्याचा विपरीत परिणाम झालेला पहावयास मिळतो.

### वकिलांची मदत

लवाद्दाव्यांतील पक्षकार अनभिज्ञ, अशिक्षित असतात. सहकारी कायद्याविषयीं अगर त्यांत सांगितलेल्या कामकाजाचे पद्धतीविषयीं ते संपूर्ण अनभिज्ञ असतात. कोणत्या वेळेस काय काम होणार आहे, कागदपत्र व पुरावा केव्हां हजर करावयाचा, साक्षीदारांचे जबाब, उलटतपासणी, वगैरे बाबतींत त्यांना कांहींहि माहिती नसते. अशावेळीं अप्रमाणिक व हुशार पक्षकार प्रति-पक्षावर सहज मात करूं शकतो. अनभिज्ञ, निरक्षर अशा पक्षकारांना त्यांचे हक्कहितसंबंधाच्या जपणुकीच्या दृष्टीनें योग्य त्या तज्ज्ञ वकिलाची मदत घेतां यावी यासाठी वकीलवर्गास ह्या दाव्याच्या कामीं हजर राहाणेस व काम करणेस परवानगी ठेवावी. कायदेशीर गुंतागुंतीच्या, मोठ्या पैक्याच्या अगर दौलतीच्या दाव्यांत तर वकीलवर्गाची उणीव प्रकर्षानें भासते व तज्ज्ञ मंडळींचा सल्ला न घेतां आलेमुळें निरक्षर पक्षकारांचेवर नकळत अन्याय होत राहातो. झालेल्या अन्यायाचें परिमार्जन न करतां आलेमुळें सहकारी चळवळीविषयीं त्यांचें प्रेम व श्रद्धा नष्ट होऊन सहकारी क्षेत्राविषयीं त्यांचे मनांत उबग निर्माण होते. ही परिस्थिति संपूर्णपणें पालटणेसाठी वकीलवर्गाची मदत सहकारी दाव्यांत घेतां येईल अशी तरतूद करणें जरूरीचें आहे.

---

### अमेरिकेंतील चित्रपटस्पर्धेत हिंदी चित्रपटास पहिला अनुक्रम

सॅनफ्रॅन्सिस्को येथील आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलमध्यें १२ देशांतील १५ चित्रपट दाखविण्यांत आले. त्यांत "पथेर पांचाली" हा हिंदी बोलपट सर्वश्रेष्ठ ठरला. त्या बोलपटाचे दिग्दर्शक, श्री. सत्यजित रॉय हे पहिल्या अनुक्रमाचे दिग्दर्शक म्हणून निवडले गेले. सॅनफ्रॅन्सिस्को विभागांतील पांच प्रमुख वृत्तपत्रांच्या चित्रपट-विवेचकांनीं परीक्षकाचें काम केलें.

---

**मद्रास राज्याचें उत्पन्न**—मद्रास राज्याच्या अर्थमंत्र्यांच्या मतानें, राज्याच्या उत्पन्नांत दरसाल निदान ४० लाख रुपयांची वाढ होईल. साखर, कापड, आणि तंबाखू ह्यांच्यावरील विक्री, कराऐवजीं ह्या वस्तूंवरील अबकारी करांत जी वाढ करण्यांत आली आहे, तीमुळें ही वाढ होईल असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**उत्तर गुजरातमधील रस्ते**—१९५७-५८ च्या आर्थिक वर्षांत उत्तर गुजरातमध्यें रस्ते आणि पूल बांधण्याचीं कामें कर-ण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. बांधकामाच्या ह्या योजनेला ३३ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. कार्यक्रमामुळें अहमदाबाद शहर उत्तर गुजरातमधील इतर कांहीं मोठ्या शहरांशीं जोडलें जाईल. अहमदाबाद-अबू रस्त्यावर पांच मोठे पूल बांधण्यांत येणार आहेत.

**चिनीमातीच्या भांड्यांचें संशोधनकेंद्र**—मद्रास राज्यांत गुडूर ह्या ठिकाणीं चिनी मातीच्या भांड्यांबद्दल संशोधन करणारें केंद्र आहे. हें केंद्र व त्यामधील संशोधनाला उपयोगी पडणारी यंत्रसामुग्री आतां मद्रास येथें नव्या केंद्रांत हलविण्यांत येणार आहे. ह्या हलवाहलवीसाठी राज्य सरकारनें २९,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

**रुपयांत किंमत देणार**—भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि युगोस्लाव्हिआ ह्यांच्यांत व्यापारी देणींघेणीं चुकती करण्यासाठीं एक करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें भारतानें आयात केलेल्या मालाची किंमत दिल्लींतील स्टेट बँकेंत रुपयाच्या चलनांत जमा करण्यांत येईल. जमा झालेल्या रकमेचा उपयोग करून युगोस्लाव्हिआ भारतामधून त्याला हवा तो माल घेईल.

**म्हैसूर सरकारची विनंती**—म्हैसूर राज्यांतील गुलबर्गा, बिदर, रायचूर, विजापूर आणि कारवार ह्या जिल्ह्यांतील रस्त्यांचें दळणवळण सुकर करण्यासाठी म्हैसूर सरकारनें भारत सरकारकडे २ कोटी रुपये कर्जाची मागणी केली आहे. राज्या-च्या राजधानीपासून ह्या भागांत जाण्यासाठी सरळ व जवळचे असे रस्ते नाहींत, म्हणून ही मागणी करण्यांत आली आहे.

### सोसायट्यांच्या धर्मादाय कामासाठी देणग्या

रिझर्व्ह फंड व शिक्षण फंड यांची व्यवस्था केल्यानंतर, कोणत्याहि सहकारी मंडळीस आपल्या नफ्याच्या २०% पर्यंत रक्कम धर्मादाय म्हणून काढून ठेवतां येते किंवा देतां येते. मात्र त्याला बॉंबे स्टेट को. युनियनची मंजुरी घ्यावी लागते. गरिबांस मदत, शिक्षण, औषधपाणी किंवा सार्वजनिक कामें ह्यांचा धर्मादाय काम ह्यांत समावेश होतो. १९५६–५७ मध्यें अशा रीतीनें ६६८ सोसायट्यांनी २,६०,२८३ रु. देणगीदाखल देण्यास युनियननें मंजुरी दिली. त्यापूर्वीच्या वर्षांचे तुलनात्मक आंकडे येथें दिले आहेत.

| वर्ष | सोसायट्यांची संख्या | देणगीची रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १९५२–५३ | ५८० | २,५३,४३३ |
| १९५३–५४ | ५८३ | २,६१,३८० |
| १९५४–५५ | ६२९ | २,८४,०२९ |
| १९५५–५६ | ५८३ | २,४२,७७८ |
| १९५६–५७ | ६६८ | २,६९,२८३ |

### इन्कम टॅक्सचें उत्पन्न

(कराची रक्कम कोटी रुपयांत)

| | १९५०–५१ | १९५५–५६ |
|---|---|---|
| कर भरणारांची संख्या | ३,९५,०१७ | ४,५४,६९५ |
| कर | ६३,७० | ७९·४१ |
| हिंदु अविभक्त कुटुंबें : | | |
| कर भरणारांची संख्या | ५२,४०१ | ३९,६३३ |
| कर | १४·२५ | ११·०४ |
| रजिस्टर न केलेल्या फर्म्स : | | |
| कर भरणारांची संख्या | १९,४८२ | २३,१४८ |
| कर | ७·१३ | ९·०१ |
| कंपन्या : | | |
| कर भरणारांची संख्या | ८,५१९ | १०,२६१ |
| कर | ६९·९७ | ८२·४६ |

### रोख्यांच्या किंमती उतरल्याचा बँकेवर परिणाम

#### बर्मिंगहॅम येथील आयडिअल बँक बंद पडली.

बर्मिंगहॅम येथील १०,९८,००० पौंड ठेवी असलेली 'दि आयडिअल बँक' हिनें गेल्या महिन्याचे प्रारंभीं ठेवी घेण्याचें व ठेवी परत देण्याचें बंद केलें. बँक ही ट्रस्टी सेव्हिंग्ज बँक नसल्याकारणानें, तिच्याकडील ठेवींना गॅरंटी नव्हती. १८९६ सालीं दि आयडिअल बँक स्थापन झाली. बँकेच्या इन्व्हेस्टमेंट्सची बाजारांतील किंमत उतरली आणि बँकेला त्यामुळें बरेंच नुकसान आलें. बँक ठेवींवर भारी दरानें व्याज देत होती, तरी ठेवी काढून घेतल्या जाऊं लागल्या, आणि बँकेला दरवाजे बंद करणें भाग पडलें.

### स्कॉटिश बँकांचें एकत्रीकरण

दि नॅशनल बँक ऑफ स्कॉटलंड आणि दि कमर्शिअल बँक ऑफ स्कॉटलंड ह्यांचेमध्यें एकत्रीकरणाबद्दल वाटाघाटी चालू आहेत, असें दोन्ही बँकांच्या संचालक मंडळांनीं जाहीर केलें आहे. नॅशनल बँक ऑफ स्कॉटलंडच्या शेअर्सपैकी ९७¾% शेअर्स लॉइड्स बँक धारण करीत आहे. म्हणजे, लंडनच्या एका प्रमुख बँकेच्या हातीं स्कॉटलंडमधील हस्तेंबंदीच्या व्यवहारांना कर्जपुरवठा करण्याचा बँकिंगचा व्यवहार येणार आहे.

## "अर्था"चा दिवाळी अंक

### "विवेक"चें मत

#### अर्थ

(साप्ताहिक, पुणें; पृष्ठें : ४६; मूल्य : १ रुपया; संपादक : श्री. वा. काळे)

आर्थिक विषयावरील मराठींतील मासिकांचा वा नियतकालिकांचा पुरेसा प्रचार, प्रसार व खप कां होत नाहीं याचीं अथपासून इतिपर्यंत सर्व कारणें 'अर्था'च्या या दिवाळी अंकांत सांपडतील. विषयांची विविधता त्यांतसुद्धां 'बँकिंग' व 'कंपन्या' हे जे दोन विषय आहेत ते विषय सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशीं दूरान्वयानें संबंध असलेले, त्याबद्दलचें बहुतेक सर्व लिखाण आर्थिक विषयाची माहिती नसलेल्या वाचकाला कंटाळवाणें व नीरस वाटेल असेंच. सर्व लेख अत्यंत खुरटे, त्यामुळें त्यांना लेख म्हणणें जरा धाडसाचेंच. निरनिराळ्या लोकांकडून दोन विषयांवर लिहून घेतलेल्या लहान लहान टिपण्या ( notes ) असेंच त्यांचें यथायोग्य वर्णन करावें लागेल. त्यांतल्या त्यांत 'ग्रामीण विभागांत व्यापारी बँकांना क्षेत्र' हा श्री. सराफ यांचा लेख व 'बँकिंग क्षेत्रांतील दर–युद्ध परिस्थिति' हा चिं. वि. जोग यांचा लेख बरे व वाचनीय म्हणून दाखवितां येतील.

सजावट, आकर्षकता यांचें या अंकांत नांवनिशाण नाहीं. आलेख, रेखाचित्रें, कलात्मक अक्षरांतील ललित भाषेंतील शीर्षकें अशा विविध उपायांनीं आर्थिक विषयावरील अंकसुद्धां आकर्षक स्वरूपांत वाचकांना देतां आले पाहिजेत. या दृष्टीनें इंग्रजी भाषेंतील या विषयावरचीं कांहीं नियतकालिकें नमुनेदार आहेत. या मासिकाच्या संचालकांपुढें हें सर्व असेल अशी आशा ठेवावी. पण त्या दृष्टीनें सुधारणांचे कांहीं प्रयत्न न झाल्यास 'अर्थ'चें अस्तित्व निरर्थक ठरेल.

—'विवेक', मुंबई (८–१२–५७)

### "नवसंदेश"चें मत

अर्थ (हा अंक ४६ पानांचा असून त्याची किंमत १ रु. आहे. संपादक : श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए. पुणें) भारत सरकारचे माजी अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांनीं म्हटल्याप्रमाणें "सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असतात व सध्यांच्या गुंतागुंतीच्या घडामोडीची अंतःप्रवणता समजणें त्याला विशेष कठीण असते. त्या समजून घेण्यांत त्यांना साहाय्य देणें हें अर्थ या साप्ताहिकाचें कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. अर्थ हीं कामगिरी उत्तम रीतीनें करीत आहे." या प्रशस्तीची प्रचीती हा दिवाळी अंक वाचल्यास चटकन् पटते.

—'नवसंदेश', कोल्हापूर (२१–१२–५७)

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंपुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

गेलीं १७ वर्षें सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. १,८७,००० |
| ठेवी | ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | |
|---|---|
| १ व २ वर्षें मुदत | द. द. शें. ३ टक्के |
| ३ ,, ,, | ,, ३। ,, |
| ४ ,, ,, | ,, ३॥ ,, |
| ५ ,, ,, | ,, ४ ,, |
| सेव्हिंग्ज बँक | ,, २ ,, |
| होम सेव्हिंग्ज बँक | ,, २½ ,, |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठीं क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षें सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यांनंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराचीं पंचवार्षिक कॅश-सर्टिफिकेट्साहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठी समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ, बेळगांव. — एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर

# दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. ७,००,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदाळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड ( सांगली )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४२,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९२,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर्स

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

गेलीं २७ वर्षे सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,८७,००० |
| ठेवी ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | |
|---|---|
| १ व २ वर्षे मुदत | द. द. शें. ३ टक्के |
| ३ ,, ,, | ,, ३। ,, |
| ४ ,, ,, | ,, ३॥ ,, |
| ५ ,, ,, | ,, ४ ,, |
| सेव्हिंग्ज बँक | ,, २ ,, |
| होम सेव्हिंग्ज बँक | ,, २½ ,, |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठी क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षे सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यांनंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराचीं पंचवार्षिक कॅश-सर्टिफिकेट्सहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठीं समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ, बेळगांव. — एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर

# दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. ७,००,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड (सांगली)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.